मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवडमध्ये महायुतीत मिठाचा खडा!

## स्वबळाच्या घोषणेमुळे पालिका निवडणुकीत राजकीय समीकरण बदलण्याची शक्यता

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आगामी निवडणुकांवर स्वबळाच्या घोषणांनी राजकीय वातावरण तापले आहे. भारतीय जनता पक्षाचे (भाजप) आमदार शंकर जगताप यांनी महापालिका निवडणुका स्वबळावर लढण्याचे संकेत काही काळापूर्वी दिले होते. त्यांच्या या विधानानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अण्णा बनसोडे यांनीही महापालिका स्वबळावर लढणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे शहरातील महायुतीत मिठाचा खडा पडल्याचे स्पष्टपणे दिसत आहे.



पिंपरी-चिंचवड महापालिकेत तब्बल २५ वर्षे राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता होती. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप आणि आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वाखाली सात वर्षांपूर्वी ही सत्ता उलथवून भाजपने मोठे यश मिळवले. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये शहर पातळीवरील नेत्यांमध्ये एकवाक्यता नसल्याचा फायदा भाजपला २०१७ च्या महापालिका निवडणुकीत झाला होता. त्यानंतर भाजपने पिंपरी-चिंचवडमध्ये आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते. शहरातील राष्ट्रवादी काँग्रेसचे एकमेव आमदार अण्णा बनसोडे हे अजित पवार यांचे निष्ठावंत मानले जातात. मागील अडीच वर्षांत राज्यातील सत्तासंघर्षाच्या वेगवेगळ्या घडामोडींमध्ये अण्णा बनसोडे यांनी अजित पवारांना पाठिंबा दिला होता. मात्र, त्यांना पक्षाकडून राज्यपातळीवर नेहमीच दुय्यम स्थान मिळाले असल्याची खंत त्यांच्या कार्यकर्त्यांनी नेहमीच बोलून दाखवली आहे. प्रत्येक कसोटीत अजित पवार यांना साथ देणाऱ्या बनसोडे यांच्याकडे पक्षाने मात्र दुर्लक्ष केल्याचे दिसत आहे.

### महायुतीत तणाव; भाजप-राष्ट्रवादीत थेट लढत

भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्वबळाच्या घोषणांमुळे महायुतीत तणावाची परिस्थिती आहे. शिवसेना, भाजप, आणि राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांनी मिळून महायुतीचा भाग म्हणून निवडणुका लढवण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, शहर पातळीवरील नेत्यांच्या स्वबळाच्या घोषणांमुळे स्थानिक पातळीवरील राजकीय समीकरणे बदलत असल्याचे दिसत आहे. महापालिकेच्या निवडणुकीत भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये थेट लढत होण्याची शक्यता आहे. तिन्ही पक्षांनी स्वबळाचा नारा दिल्याने महायुतीतील एकत्रित लढ्याची संकल्पना धोक्यात येत आहे. विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत दुफळीचा फायदा विरोधकांना होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर, आगामी महापालिका निवडणुकीत स्थानिक पातळीवर नेतृत्व, पक्षांतर्गत गटबाजी, आणि प्रचाराची धोरणे यांचा मोठा प्रभाव राहणार आहे. स्वबळाच्या घोषणांनी एकीकडे मतदारांमध्ये उत्सुकता निर्माण केली असली, तरी दुसरीकडे महायुतीच्या एकोप्याला तडा जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे महापालिकेतील सत्ता कोणाच्या हाती येणार, हे पाहणे रंजक ठरणार आहे.

### भाजपच्या स्वबळाच्या तयारीची रणनीती

» आमदार शंकर जगताप यांनी स्वबळावर निवडणुका लढण्याचा दावा केल्यामुळे भाजपची रणनीती स्पष्ट होत आहे. पक्षाची संघटनात्मक ताकद आणि मागील निवडणुकांमधील विजयाच्या जोरावर भाजपने स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला असल्याचे स्पष्ट झाले आहे. महेश लांडगे आणि शंकर जगताप यांच्यासारख्या नेत्यांनी शहरातील मतदारांवर मजबूत पकड निर्माण केली आहे.

# रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी दिली सव्वा कोटींची 'वर्कऑर्डर'

## पुणे-बेंगलोर महामार्गाच्या पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील रस्त्यांची दुरुस्ती करण्यात येणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे-बेंगलोर महामार्गाच्या पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील वाकड, पुनावळे, ताथवडे परिसरातील रस्त्यांची दुरुस्ती करण्यात येणार आहे. त्या दोन्ही कामांसाठी एकूण १ कोटी २० लाख रुपयांचा खर्च करण्यात येणार आहे.

या भागांत मोठ्या प्रमाणात वाहतूक रहदारी आहे. हिंजवडी आयटी पार्क तसेच, महामार्गावर जाण्यासाठी या मार्गाचा वापर केला जातो. या रस्त्यांवर पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात खड्डे पडतात. त्यामुळे पाणी साचून वाहतूक कोंडी होते. त्यामुळे वाहनचालकांची मोठी गैरसोय होते.

त्याबाबत महापालिकेकडे असंख्य तक्रारी प्राप्त होतात. त्याची दखल घेऊन महापालिकेने या भागातील रस्ते दुरुस्त करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या कामासाठी स्थापत्य 'ड' मुख्यालय विभागाने ८९ लाख ५० हजार ९४८ खर्चाची निविदा प्रसिद्ध केली होती.



त्यासाठी ७ ठेकेदारांच्या निविदा पात्र ठरल्या. त्या सर्व निविदा २२ ते ३५ टक्के कमी दराच्या आहेत. त्यात तब्बल ३५ टक्के कमी दराची ५९ लाख ३७ हजार १०३ रुपये खर्चाची सिद्धिकी प्लंबिंग ॲण्ड ड्रेनेज सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर यांची निविदा स्वीकारण्यात आली आहे. कामाची मुदत १२ महिने आहे.

या भागांतील महामार्गाच्या पश्चिमेकडील भागांतील रस्ते दुरुस्तीसाठी ८९ लाख ४८ हजार ८६२ खर्चाची निविदा काढण्यात आली. त्यालाही ७ ठेकेदार पात्र झाले, त्याचेही दर २२ ते ३५ टक्के कमी आहेत. त्यात २५ टक्के कमी दराची ५९ लाख ३५ हजार ८८५ रुपये खर्चाची सिद्धिकी प्लंबिंग ॲण्ड ड्रेनेज सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर यांची निविदा स्वीकारण्यात आली आहे. कामाची मुदत १२ महिने आहे. या खर्चास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी स्थायी समितीची मान्यता दिली आहे. दरम्यान, दोन्ही कामे १० टक्केपेक्षा कमी दराने असल्याने संबंधित ठेकेदाराकडून अनुक्रमे ७१ लाख ३८ हजार रुपये आणि ४१ लाख ३७ हजार रुपये अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम जमा करून घेण्यात आली आहे.

# पुण्यातील 487 गृहप्रकल्पांना स्थगिती

## राज्यातील 1 हजार 905 प्रकल्पांना महारेराने स्थगिती : पुण्यातील सर्वाधिक 487 प्रकल्पांचा समावेश

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील १० हजार ७३३ व्यापगत गृहनिर्माण प्रकल्पांना महारेराने कारणे दाखवा नोटिसा बजावल्या होत्या. या नोटिशीला प्रतिसाद न देणाऱ्या राज्यातील १ हजार ९०५ प्रकल्पांना महारेराने स्थगिती दिली आहे. यात पुण्यातील सर्वाधिक ४८७ प्रकल्पांचा समावेश असून, त्यांची बँक खातीही गोठविण्यात आली आहेत.




महारेराकडे गृहनिर्माण प्रकल्पाच्या नोंदणीच्या वेळी प्रकल्प पूर्ततेची दिलेली तारीख उलटून गेल्यानंतरही माहिती अद्ययावत न करणाऱ्या १० हजार ७७३ व्यापगत प्रकल्पांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आल्या होत्या. या प्रकल्पांना अपेक्षित माहिती अद्ययावत करण्यासाठी ३० दिवसांचा कालावधी देण्यात आला. या नोटिशींना ५ हजार ३२४ प्रकल्पांनी योग्य प्रतिसाद दिला. यापैकी ३ हजार ५१७ प्रकल्पांनी भोगवटा प्रमाणपत्र सादर केले आहे. याचवेळी ५२४ प्रकल्पांनी मुदतवाढीसाठी अर्ज केले आहेत. तसेच, १ हजार २८३ प्रकल्पांच्या प्रतिसादांची छाननी सुरू आहे, अशी माहिती महारेराने दिली आहे.

नोटिशीला प्रतिसाद न देणाऱ्या राज्यातील १ हजार ९५० प्रकल्पांवर स्थगितीची कारवाई करण्यात आली आहे. त्यांचे बँक खाते गोठवण्यात आले आहे. याचबरोबर या प्रकल्पांशी संबंधित खरेदी-विक्री व्यवहार करण्यावरही निर्बंध लादण्यात आले आहेत. याबाबतच्या सूचना सहजिल्हा निबंधकांना देण्यात आल्या आहेत. याशिवाय प्रतिसाद न देणाऱ्या आणखी ३ हजार ४९९ प्रकल्पांवरील कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे, असेही महारेराने नमूद केले आहे.

### कारवाई नेमकी काय?

प्रकल्पाची थेट नोंदणी रद्द करणे किंवा स्थगित करणे
प्रकल्पावर दंडात्मक कारवाई
सदनिकांच्या खरेदी-विक्री व्यवहाराच्या नोंदणीवर निर्बंध
प्रकल्पाचे बँक खाते गोठवणे

### प्रकल्पांकडून उल्लंघन कशाचे?

» महारेरा नोंदणी क्रमांकासाठी अर्ज करताना प्रत्येक विकासकाला प्रकल्प पूर्ण होण्याची तारीख नोंदवावी लागते. प्रकल्प पूर्ततेच्या तारखेनंतर प्रकल्प पूर्ण झालेला असेल तर भोगवटा प्रमाणपत्रासह, प्रपत्र ४ सादर करावे लागते. प्रकल्प अपूर्ण असेल तर मुदतवाढीसाठीची प्रक्रिया सुरू करावी लागते. प्रकल्प सुरू करण्यातच काही अडचणी आलेल्या असल्यास प्रकल्प रद्द करण्यासाठी अर्ज करणे आवश्यक असते. प्रत्येक विकासकाला तिमाही आणि वार्षिक अशी विहित विवरण प्रपत्रे संकेतस्थळावर अद्ययावत करणे बंधनकारक आहे. मुदतीत ही प्रक्रिया पूर्ण न करणाऱ्या प्रकल्पांवर कारवाई केली जाते.

"प्रत्येक गृहनिर्माण प्रकल्पाने घर खरेदीदारांना प्रकल्पाची स्थिती कळावी, यासाठी कायद्याने अपेक्षित असलेली प्रकल्पस्थिती महारेराच्या संकेतस्थळावर त्रैमासिक, वार्षिक अशा कालबद्ध पद्धतीने अद्ययावत करणे बंधनकारक आहे. या नियमाची पूर्तता न करणाऱ्या गृहनिर्माण प्रकल्पांवर कारवाईचे पाऊल उचलण्यात आले आहे.

**- मनोज सौनिक, अध्यक्ष, महारेरा.**

# सोसायटी अध्यक्षांकडे येणार मालमत्ताकर थकबाकीदारांची यादी

## तातडीने करावा मालमत्ताकराचा भरणा : करसंकलन विभागाचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील मालमत्ताकर थकबाकी असणाऱ्या नागरिकांची नावे, फ्लॅट नंबर, थकीत रक्कम आदी माहिती करसंकलन विभागाकडून ६५१ सोसायटींच्या अध्यक्ष तथा चेअरमन यांना पाठवण्यात येणार आहे. थकबाकी असणाऱ्या मालमत्ताधारकांची यादी सोसायटीच्या नोटीस बोर्डवर, सोसायटीच्या व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपमध्ये पाठवून, अशा सभासदांना करभरणा करण्यासाठी त्यांनी आवाहन करावे, असे करसंकलन विभागाने नमूद केले आहे.




पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व संकलन विभागामार्फत आकारणी न झालेल्या मालमत्तांची नोंदणी व आकारणीची कार्यवाही करण्यासाठी मे. स्थापत्य कन्सल्टंट प्रा.लि. या खासगी कंपनीची नेमणूक करण्यात आली असून, त्यांच्यामार्फत शहरातील मालमत्तांचे सर्वकष सर्वेक्षण सुरू आहे. मालमत्तांच्या सर्वेक्षणामध्ये ६४,२६० मालमत्तांची नव्याने आकारणी करण्यात आली असून, त्या मालमत्तांना कराचे बिलही देण्यात आले आहे. मालमत्ता सर्वेक्षणामध्ये नव्याने आकारणी झालेल्या मालमत्तांमध्ये ६९० सोसायट्यांमधील ५६,२३२ मालमत्तांना मालमत्ताकराचे बिल देण्यात आले असून यामधून ६५१ सोसायटीमधील ३६,९८० मालमत्ताधारकांचा ६९.५६ कोटींचा कर थकीत आहे. थकबाकी असणाऱ्या मालमत्ताधारकांना एसएमएस, टेलिकॉलिंग या माध्यमातून कराचा भरणा करण्याचे आवाहन वारंवार करसंकलन विभागाकडून करण्यात येत आहे.

"शहरातील आकारणी न झालेल्या मालमत्तांची नोंदणी व कर आकारणी कार्यवाही करण्यासाठी मे. स्थापत्य कन्सल्टंट प्रा. लि. या खासगी कंपनीकडून मालमत्तांचे सर्वकष सर्वेक्षण करण्यात येत आहे. अद्यापही कराचा भरणा न केलेल्या सोसायट्यांमधील मालमत्तांची यादी संबंधित सोसायटी अध्यक्षांना पाठवण्यात येणार असून, सोसायटी अध्यक्षांनी अशा थकबाकीदारांकडे तसे आवाहन करून सहकार्य करावे.

**- प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, महापालिका**

"शहरातील सोसायट्यांच्या अध्यक्षांना करसंकलन विभागाकडून करभरणा न केलेल्या मालमत्ताधारकांची यादी कराच्या थकीत रकमेसह पाठवण्यात येणार आहे. संबंधित सोसायटी अध्यक्षांनी त्यांना पाठवण्यात आलेली यादी सोसायटीच्या ठळक जागी, नोटीस बोर्ड व सोसायटी व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवर पाठवावी. तसेच मालमत्ताकराची थकबाकी ऑनलाईन प्रणालीद्वारे भरण्यासाठी अध्यक्षांनी पुढाकार घ्यावा.

**- अविनाश शिंदे, साहाय्यक आयुक्त, कर संकलन विभाग, महापालिका.**

# पिंपरी डेअरी फार्म उड्डाणपूलाचे काम वेगात

## नोकरी, व्यवसाय किंवा अन्य कामासाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांचा वेळ वाचणार



**पिंपरी | प्रतिनिधी**

जुन्या पुणे-मुंबई रस्त्यावरुन पिंपरीगाव, पिंपळे सौदागर, काळेवाडी, रहाटणी यासह विविध गावांना जोडणाऱ्या पिंपरी डेअरी फार्म येथील उड्डाणपूलाचे काम वेगात सुरु आहे. महानगरपालिकेला रेल्वे प्रशासनाने पिंपरीतील इंदिरा गांधी उड्डाणपूल धोकादायक बनल्याचे पत्र दिले होते. त्यामुळे पिंपरीसह विविध गावात जाण्यासाठी वाहतूकीला डेअरी फार्म उड्डाणपूल दळणवळणासाठी महत्वाचा ठरणार आहे. त्यामुळे डेअरी फार्म उड्डाणपूलाचे काम विहीत मुदतीत पुर्ण करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक सुधारण्यासाठी महानगरपालिकेने हाती घेतलेले डेअरी फार्म येथील उड्डाणपूल बांधण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प सध्या प्रगतीपथावर आहे. या उड्डाणपुलाचे सबस्ट्रक्चरचे काम ८० टक्के पूर्ण झाले आहे. उर्वरित २० टक्के काम हे रेल्वे विभागाशी संलग्न आहे. सुपर स्ट्रक्चरचे २५ टक्के काम पूर्ण झाले असून मार्च अखेरीस ५५ टक्के काम पूर्ण होणार आहे. तसेच रस्त्याचे काम ६० टक्के झाले असून उड्डाणपुल व रस्त्याचे उर्वरित काम मार्च २०२५ पर्यंत पूर्ण करून हा उड्डाणंपूल नागरिकांसाठी खुला करण्याचे नियोजन आहे. पिंपरी डेअरी फार्म उड्डाणपुलाचे कामाबाबत कार्यादेश मार्च २०२३ मध्ये देण्यात आला होता. परंतु या प्रकल्पाच्या कामास काही वृक्षांचा अडथळा येत होता. या पुलाच्या मान्य रेखाचित्रानुसार पुलाच्या बांधणीमध्ये अडथळा ठरणारे वृक्ष काढणे / पुनर्रोपण करणेबाबत ऑगस्ट २०२३ मध्ये मंजुरी देण्यात आली. एकूण पुर्णपणे काढाव्या लागणाऱ्या वृक्षांची संख्या १४२ वृक्ष इतकी होती. तसेच पुनर्रोपण करावयाच्या वृक्षांची संख्या ६४ वृक्ष इतकी होती.

पुलाच्या बांधणीने बाधित होणारे वृक्ष हे संरक्षण विभागाच्या हद्दीत असल्याने झालेल्या करारानुसार सदरच्या वृक्षांचे मुल्य संरक्षण विभागाकडे जमा केलेनंतर वृक्ष काढावयाची परवानगी संरक्षण विभागाकडून मिळणार होती. त्यानुसार या वृक्षांचे मुल्यांकन वन परिक्षेत्र अधिकारी पुणे यांचेमार्फत सप्टेंबर २०२३ मध्ये घेण्यात आले. या प्रस्तावास पाठपुरावा करुन वृक्ष काढावयाची परवानगी मार्च २०२४ मध्ये मिळाली. त्यास अनुसरुन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने मे २०२४ रोजी सदरचे १४२ वृक्ष हटवले. त्यानंतर त्या जागेतील पूलाच्या पायाचे काम सुरु करण्यात आले. तसेच वृक्षांच्या पुनर्रोपणाच्या सूचना संरक्षण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सर्व वृक्षांचे पुनर्रोपण हे संरक्षण विभागाच्या हद्दीमध्ये करण्यात आलेले आहे. तसेच हा पूल रेल्वे विभागाशी संलग्न असल्याने रेल्वे विभागातील विविध विभागांशी समन्वय साधून सर्व विभागांची मान्यता मिळाली. त्यानंतर या पुलाचे काम वेगाने सुरू करण्यात आले आहे. सदरचा पूल मुदतीमध्ये पूर्ण करण्याचे नियोजन असून त्यानंतर लोहमार्ग फाटकासमोर होणारी वाहतूक कोंडी आणि अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

### वाहनचालकांना मिळणार दिलासा

**» पिंपरी डेअरी फार्म येथील लोहमार्गावर पूल उभारल्यामुळे वाहतुकीसाठी रेल्वे सिग्नलवर थांबण्याची गरज राहणार नाही. यामुळे नोकरी, व्यवसाय किंवा अन्य कामासाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांचा वेळ वाचणार आहे. हा पूल खुला झाल्यानंतर पिंपरीतील डेअरी फार्म, पिंपळे सौदागर, रहाटणी, काळेवाडी आणि पिंपरी गावातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.**

“पिंपरी-चिंचवड महापालिकेने नागरिकांच्या सुविधांचा विचार करून या प्रकल्पाला प्राधान्य दिले आहे. महापालिकेच्या अथक प्रयत्नांमुळे हा पूल वेळेत पूर्ण होऊन वाहतुकीसाठी खुला केला जाईल. या प्रकल्पामुळे पिंपरीतील वाहतुकीची समस्या सुटेल आणि परिसरातील नागरिकांचा प्रवास सोयीचा होणार आहे. रहाटणी, पिंपळे सौदागर, पिंपरी येथील नागरीकांना संत तुकाराम मेट्रो स्टेशनपर्यंत पोहचणे सोपे होणार आहे.

**- विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# वाकडमधील अनधिकृत बांधकामांवर हातोडा!

## महापालिकेच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाची कारवाई : 137 शेड, 18 घरे जमीनदोस्त



**पिंपरी | प्रतिनिधी**

वाकड दत्त मंदिर रोड येथील ४५ मीटर रस्ता रुंदीकरणास अडथळा ठरणाऱ्या अनधिकृत व्यावसायिक पत्राशेड, बांधकामांवर महापालिकेच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने कारवाई केली. या कारवाईत १३७ पत्राशेड, १८ घरे जमीनदोस्त करण्यात आली. या कारवाईदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

महापालिकेच्या ‘ड’ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत येत असलेल्या वाकड दत्त मंदिर रोड येथील ४५ मीटर रस्त्याचे रुंदीकरण करण्यात येणार आहे. रुंदीकरणाच्या जागेवर अनधिकृत पत्राशेड व आरसीसी बांधकामे झाली होती. महापालिकेकडून १४ ऑगस्ट २०२४ पासून पत्राशेड, बांधकामधारकांना नोटिसा बजाविण्यात आल्या होत्या. ज्या जागामालकांनी नोटीस स्वीकारल्या नाहीत. त्या चिकटविण्यात आल्या. तीन जानेवारी २०२५ पासून अतिक्रमण वाहनामधून अनधिकृत बांधकाम व पत्राशेड काढून घेण्याबाबत जाहीर आवाहन करण्यात आले. सहा जानेवारीपासून रस्ता रुंदीकरणाची कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतरही नागरिकांनी अनधिकृत बांधकाम काढून घेण्याकडे दुर्लक्ष केल्याने महापालिकेने कारवाई केली.

पहिल्या दिवशी ७० पत्राशेडवर कारवाई केली. दुसऱ्या दिवासापासून निवासी इमारतीवर कारवाई करण्यात आली. तीन दिवसांच्या कारवाईत १३७ व्यावसायिक अनधिकृत पत्राशेड, निवासी बैठी घरे, दोन व चार मजली घरे अशा १८ बांधकामांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये अंदाजे ६२,००० चौरस मीटर क्षेत्र निष्कासित करण्यात आले. दोन जेसीबी, दोन पोकलेन मशीन आणि दोन ब्रेकर मशीनच्या साहाय्याने ही कारवाई करण्यात आल्याचे शहर अभियंता मकरंद निकम यांनी सांगितले.

# आळंदीतील खासगी वारकरी शिक्षण संस्थांची होणार तपासणी

## बेकायदा संस्थांवर कारवाईची शक्यता : आळंदीकरांच्या ठिय्या आंदोलनानंतर प्रशासनास जाग

**पुणे | प्रतिनिधी**

तीर्थक्षेत्र आळंदी येथे शनिवारी (दि. 4) मध्यरात्री एका खासगी वारकरी शिक्षण संस्थेत 12 वर्षीय विद्यार्थ्यांवर अनैसर्गिक लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीविरूद्ध गुन्हा दाखल करुन अटक केली.

दरम्यान, यापूर्वी देखील आळंदीतील काही खासगी वारकरी शिक्षण संस्थांमध्ये अल्पवयीन वारकरी साधकांवर लैंगिक अत्याचाराच्या घटना घडल्या आहेत. वारंवार घडणाऱ्या घटना चिंताजनक आहेत. यावर कडक कारवाई करावी, खासगी वारकरी शिक्षण संस्था कायमस्वरूपी बंद काराव्यात या मागणीसाठी आळंदीकर ग्रामस्थांनी आळंदी पोलीस ठाणे आवारात ठिय्या मांडला होता. त्यानंतर आता तातडीने वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बैठक घेतली असून अशा वारंवार घडणाऱ्या घटनांना आळा घालण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी पाऊले उचलली आहेत.

पिंपरी चिंचवड पोलिस उप आयुक्त परिमंडळ 1 डॉ. शिवाजी पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीसाठी सहा. पोलीस आयुक्त चाकण विभाग राजेंद्रसिंह गौर, पोलीस निरीक्षक नाथा घार्गे, सहा. पोलीस निरीक्षक दुर्गानाथ साळी, गट शिक्षण अधिकारी खेड अमोल जंगले, जिल्हा परिविक्षा अधिकारी महिला व बाल विकास अर्चना कठाळे, अधिक्षक मुलांचे निरीक्षक गृह येरवडा गजानन चाटे, अधिक्षक शा. भिक्षेकरी स्वीकार केंद्र येरवडा दत्तात्रय कुटे, आळंदी नगरपरिषदेचे विष्णूकुमार शिवशरण उपस्थित होते.



बैठकीत श्री क्षेत्र आळंदी येथे खाजगी वारकरी शिक्षण संस्थांच्या परवानगी बाबत चर्चा करण्यात आली. सदर संस्थांना सह धर्मादाय आयुक्त कार्यालयात नोंदणी आणि महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाचे शासन निर्णय 2015 नुसार बालकांच्या खाजगी संस्था/ वसतीगृह यांच्यासाठी नियमावली अध्यादेशाचे पालन करण्याबाबत महिला व बाल विकास विभागाकडून अधिकाऱ्यांनी संस्थाचालक नियमांचे पालन करतात का याची पडताळणी तसेच बेकायदेशीर संस्थांविरूद्ध कायदेशीर फिर्याद देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संस्थांच्या पाहणीसाठी पोलिसांकडून योग्य तो पोलीस बंदोबस्त पुरविण्यात येणार आहे. तसेच यापूर्वी ज्या संस्था चालकांवर लैंगिक गुन्हे दाखल झाले आहेत त्या संस्थाची पाहणी करून त्यांना व्यावसायिक कर लावून संस्था अस्तित्वात असल्यापासून आजपर्यंतचा मागील व्यावसायिक कर वसूल करण्याच्या सूचना नगरपरिषद अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

### बालकांच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने महिला व बालविकास विभागाची खाजगी वसतिगृहासाठी नियमावली-

१. वसतिगृहाकडे पालकांचे अर्ज छाननी करणेसाठी छाननी समिती असणे आवश्यक आहे.

२. पालकांच्या विनंती अर्जानुसार वसतिगृहांमध्ये बालकांना दाखल करण्यात येईल.

३. मुलांची/ मुलींची निवासव्यवस्था स्वतंत्र करण्यात येईल.

४. वसतिगृहांमध्ये मुलांची / विद्यार्थ्यांची व्यवस्था पाहण्यासाठी आवश्यक कर्मचारीवर्ग असावा, ज्यामध्ये वसतिगृह प्रमुख / अधिक्षक, लिपीक, मानद वैद्यकीय अधिकारी, स्वयंपाकी, मदतनीस, सफाई कामगार, रखवालदार, इत्यादींचा समावेश असावा. वसतिगृहांच्या संख्येनुसार कर्मचारी संख्या निकष ठरविण्यात यावेत.

५. वसतिगृहामध्ये खालीलप्रमाणे व्यवस्था असावी-

अ) बालकांसाठी पुरेशी निवास व्यवस्था (प्रत्येक बालकांसाठी किमान ४० स्क्वे. फू. जागा असावी)

ब) अभ्यासिका (२५ बालकांसाठी किमान ३०० स्क्वे. फू.)

क) भोजनहॉल (२५ बालकांसाठी किमान ८०० स्क्वे. फू.)

ड) स्वयंपाकगृह (२५ बालकांसाठी किमान २५० स्क्वे. फू.) इ) अभ्यागतांसाठी हॉल,

ई) बालकांच्या संख्येनुसार स्नानगृहे, स्वच्छतागृहे असावीत. (७ बालकांना एक स्वच्छता गृह तर १० बालकांसाठी एक स्नानगृह) सदरील स्नानगृहे व स्वच्छतागृहे बंदिस्त व हवेशीर असावीत.

६. वसतिगृहामध्ये जेवणाची व्यवस्था असेल तर बालकांना पोटभर / पुरेसा व पोषक आहार देण्यात यावा. ज्यामध्ये डाळी, कडधान्य, भाज्या, फळे, दूध इत्यादींचा समावेश असावा. बालकांची समिती गठित करण्यात येऊन रोजचा मेनू ठरविण्यात यावा.

७. पुरेसे, स्वच्छ व निर्जंतुक पिण्याचे पाणी तसेच वॉटर प्युरिफायर असावे.

८. केरकचरा विल्हेवाट, जलनि:सारणासाठी योग्य व्यवस्था असावी.

९. कपडे धुण्यासाठी व सुकविण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था असावी.

१०. वसतिगृहामध्ये बालकांची / बालिकांची येण्याची व जाण्याची वेळ निश्चित असेल. तसेच गेट रजिस्टरवर नोंद करणे आवश्यक राहील.

११. महिन्यातून फक्त एकदा बालकास रजेवर घरी जाता येईल.

### आळंदीत 165 खासगी वारकरी शिक्षण संस्था

» दरम्यान, आळंदीत खासगी वारकरी शिक्षण संस्थांची संख्या 165च्या वर आहे. तर मुलींच्या वारकरी शिक्षण संस्था 12 आहेत. या संस्थांमध्ये शालेय शिक्षणाबरोबरच आध्यात्मिक शिक्षण दिले जाते. एका विद्यार्थ्यासाठी वर्षाकाठी निवास, भोजन असा एकूण वेगवेगळ्या संस्थेनुसार 15 ते 30 हजार रुपयांपर्यंत आहे.

# हरीण, रानडुकराच्या कळपांचा उभ्या पिकात धुमाकूळ

## अणे, नळवणे, पेमदरा, शिंदेवाडी गावांत शेकडो शेतकऱ्यांचे हजारो रुपयांचे नुकसान

**पुणे | प्रतिनिधी**

अणे (ता. जुन्नर) येथे रानडुकरांच्या व हरणांच्या कळपाने शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान करीत आहेत. अणे, नळवणे, पेमदरा, शिंदेवाडी गावांत शेकडो शेतकऱ्यांचे हजारो रुपयांचे नुकसान हे वन्य प्राणी करत आहेत. वनविभागाने याची दखल घेऊन यावर उपाय योजना करावी अशी मागणी केली आहे.

अणे, नळवणे, पेमदरा, शिंदेवाडी या परिसरातील मळारान व बहुतांश डोंगराळ भाग असल्याने या परिसरात नेहमीच वन्य प्राणी आढळत आहेत. हरणांचे कळप दिवसा नागरिकांना दिसतात.



बिबट्याच्या भीतीनंतर आता शेतकऱ्यांनी रानडुकराच्या व हरणांच्या कळपांचा वारंवार होणाऱ्या शेती पिकांच्या नुकसानीचा धसकाच घेतला आहे. अनेक उपाय करून देखील रानडुकराचे कळप शेतात उभ्या असणाऱ्या पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान करत आहेत.

### ...तर आम्हाला परवानगी द्या !

» शेतकऱ्यांच्या शेतीमालावर वारंवार होणाऱ्या रानडुकराच्या हल्ल्यामुळे शेती पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. शेतकऱ्यांना त्यामुळे आर्थिक फटका बसत आहे. वनविभागाने या रानडुकरांचा बंदोबस्त करावा अथवा आम्हाला त्यांचा बंदोबस्त करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.